**जिल्हा परिषदकोल्हापूर**
**ग्रामपंचायत विभाग, नवीन प्रशासकीय इमारत,**
**पहिला मजला, नागाळा पार्क, कोल्हापूर**
**Email - dyceovptkop@gmail.com**

## प्रेसनोट

## जिल्हयातील जेष्ठ कलावंतांनी मानधनासाठी ऑनलाईन अर्ज करा : पालकमंत्री कोल्हापूर

" राजर्षी शाहू महाराज जेष्ठसाहित्यीक व कलावंत मानधन सन्मान योजना " अंतर्गत महाराष्ट्र शासन ,निर्णय क्र.वृकमा ४३२१ (१५) /प्रक्र. १४५ / सां.का..४ पर्यटनव सांस्कृतिक विभाग, दि. १६ मार्च २०२४ नुसारकला व साहित्य क्षेत्रातील योगदान असलेल्या मान्यवर जेष्ठ साहित्यीक व कलाकार यांना प्रती महीना **५०००/-** मानधन देणेत येते. पात्र कलाकारांनी या योजनेचा लाभ घेणसेसाठी महाराष्ट्र शासनाच्या **आपले सरकार पोर्टलवर https ://aaplesarkar.mahaonline.gov.in/enya लिंक वर सांस्कृतिककार्य संचालनालय विभाग अंतर्गत दिनांक १ जुलै २०२५ते ३१ जुलै २०२५**पर्यंत ऑनलाईन अर्ज भरणे करिता मा. नाम. प्रकाश आबिटकर पालकमंत्री कोल्हापूर यांनी आवाहन केले आहे.

**या योजनेची लाभार्थी पात्रता अशी १.** ज्यांचे वय ५० वर्षापेक्षा जास्त आहे. दिव्यांगाना वयाची अट १० वर्षांनी शिथिल करणेत येत आहे. (दिव्यांगाना वयोमर्यादा ४० वर्षे)**२.** ज्यांचेकला व साहित्यक्षेत्रातील योगदान कमीत कमी १५ वर्षे आहे. **३.** ज्यांनी साहित्य व कलाक्षेत्रातसातत्यपुर्ण , दर्जेदार व मोलाची भर घातली आहे. **४.** वयाने ज्येष्ठ असणारे, विधवा / परितक्त्या / दिव्यांग कलाकार यांना प्राधान्य राहील. **५.**ज्या कलाकाराचे सर्व मार्गांनी उत्पन्न ६०,०००/- पेक्षा जास्त नसावे. **६.**ज्याकलाकारांची उपजिविका फक्त कलेवरच अवलंबून होती मात्र सध्या त्यांना इतर कोणत्याही मार्गाने उत्पन्न नाही असे कलाकार. **७.**केंद्र किंवा राज्य शासनाच्या महामंडळे इतर कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेत अंतर्भूत नसलेले पात्र कलाकार. ८. कलाकार / साहित्यिक महाराष्ट्राचा रहिवाशी असणे बंधनकारक आहे.

**आवश्यक कागदपत्रे:** वयाचा दाखला, आधारकार्ड, उत्पन्न दाखला, रहिवाशी दाखला प्रतिज्ञापत्र, पती-पत्नी एकत्रीत फोटो, बँक पासबुक, अपंगत्व दाखला (लागु असल्यास) राज्य व केंद्र शासनाचे प्रमाणपत्र (लागु असल्यास), नामांकित संस्था व्यक्ती यांचे शिफारस पत्र (लागु असल्यास), विविध केलेचे पुरावे, आदी कागदपत्रे आवश्यक आहेत.

---

प्रति,
मा. संपादक सो,
दै. ----------------

२/- सदरची बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये देवून त्यास प्रसिध्दी देण्यात यावी ही विनंती.

सदस्य सचिव तथा
उपमुख्यकार्यकारी अधिकारी (गा.पं)
जिल्हा परिषदकोल्हापूर